# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 13 November 2024
# Time 7.10 AM to 7.20 AM
# Language Marathi
# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
# प्रादेशिक बातम्या
# दिनांक १३ नोव्हेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- निवडणूक प्रचारासाठी सर्वपक्षीय नेत्यांचे झंझावाती प्रचार दौरे;आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी
- छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात उद्या सर्व पक्षांच्या प्रमुख नेत्यांच्या सभा-प्रशासनाकडून चोख बंदोबस्त
- राज्यातल्या ४२६ मतदान केंद्रांचं नियंत्रण महिला अधिकारी-कर्मचाऱ्यांकडे
- आचारसंहिता काळात आतापर्यंत ५०२ कोटी ६३ लाख रुपयांची मालमत्ता जप्त

आणि

- भारत-दक्षिण आफ्रिका संघात आज तिसरा टी ट्वेंटी क्रिकेट सामना

****

राज्यात विधानसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. प्रचारासाठी आता आठवडाभरापेक्षाही कमी काळ शिल्लक असल्यानं सर्वच पक्षांचे ज्येष्ठ नेते राज्यभरात झंझावाती प्रचार दौरे करत आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, काँग्रेस नेते राहुल गांधी आणि इतर ज्येष्ठ नेत्यांनी काल राज्यातल्या विविध जिल्ह्यांमध्ये प्रचारसभा घेतल्या.

पुण्यात घेतलेल्या सभेत मोदींनी महायुतीचं संकल्पपत्र हीच महाराष्ट्राच्या विकासाची हमी असल्याचं सांगितलं. काश्मीरातून हटवलेलं कलम ३७० पुन्हा बहाल करण्याच्या मुद्यावरून त्यांनी काँग्रेससह इतर पक्षांवर टीका केली.

चंद्रपूर जिल्ह्यातल्या चिमूर इथं तसंच सोलापूर इथं देखील मोदी यांनी काल प्रचार सभा घेतल्या. चिमूर इथं बोलताना पंतप्रधानांनी, महायुती सरकारच्या काळात झालेल्या विकासकामांचा आढावा घेत, काँग्रेसनं नेहमीच शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडं दुर्लक्ष केल्याचा आरोप केला. ते म्हणाले,

***''काँग्रेस की इसी सोच ने हमारे महाराष्ट्र के किसानों को बदहार बनाये रखा। हमारे इस इलाके में सिंचाई के लिये काँग्रेस और उसके सहयोगीयों ने आप लोगों को कितना तरसाया है।''***

राज्यात पुन्हा एकदा सत्ता आल्यास सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना सहा हजार रुपये हमीभाव दिला जाईल, असं आश्वासनही मोदी यांनी दिलं.

****

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या काल मुंबईत दोन सभा झाल्या. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी काल लातूर जिल्ह्यात देवणी तसंच किल्लारी आणि बीड जिल्ह्यात अंबेजोगाई आणि पाटोदा इथं सभा घेतल्या.

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते योगी आदित्यनाथ यांनी काल अकोला, अमरावती आणि नागपूर इथं सभा घेतल्या.

शिवसेनेचे मुख्य नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुलडाणा जिल्ह्यातल्या मेहकर इथं प्रचार सभा घेतली, तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी लातूर जिल्ह्यात औसा इथं प्रचार सभा घेतली. महाविकास आघाडी सत्तेत आल्यावर डाळ, तांदूळ, गहू, साखर आणि तेल या जीवनावश्यक वस्तूंचे भाव स्थिर ठेवू असं आश्वासन, त्यांनी यावेळी दिलं.

दरम्यान, उद्धव ठाकरे यांचं काल औसा इथं हेलिकॉप्टरने आगमन होताच, त्यांच्या बॅगांची निवडणूक अधिकाऱ्यांनी तपासणी केली. आपल्याप्रमाणेच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या बॅगांचीही तपासणी करावी, अशी अपेक्षा ठाकरे यांनी एका चित्रफितीतून व्यक्त केली.

****

काँग्रेस नेते राहुल गांधी यांची काल गोंदिया इथं सभा झाली. यावेळी त्यांनी, काँग्रेसच्या जाहिरनाम्यात असलेल्या आश्वासनांचा पुनरुच्चार केला.

***''नरेंद्र मोदीजी तीन काले कानून लायें। देश मे सारे के सारे किसान उसके खिलाफ खडे हो गये। और नरेंद्र मोदी भाषण मे कहते है, की मै तो ये बिल किसान के फायदे के लिये लाया था। अगर आप किसान का फायदा करने***

***की कोशिश कर रहे थे, तो किसान सडकों पर क्यूं उतरा? क्यूं की किसान जानता है की आप किसान की कभी मदत नही करते हो। सोलह लाख करोड रूपये आपने अरबपतीयों का माफ किया। मै पुछता हूं, नरेंद्र मोदीजी ने दस ग्यारह साल में कितने किसानों का कर्जा माफ किया है।''***

दरम्यान, राहुल गांधी यांची बुलडाणा जिल्ह्यातल्या चिखली मतदारसंघातली कालची नियोजित सभा विमानात तांत्रिक बिघाडामुळे रद्द झाली.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी नाशिकच्या कळवण चार ठिकाणी प्रचारसभांना संबोधित केलं, तर खासदार सुप्रिया सुळे यांनी काल गडचिरोली जिल्ह्यात आलापल्ली इथं प्रचारसभा घेतली.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात फुलंब्री मतदारसंघातल्या महायुतीच्या उमेदवार अनुराधा चव्हाण यांनी काल नागरिकांशी संवाद साधला.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात उद्या गुरुवारी जवळपास सर्वच राजकीय पक्षांच्या प्रमुख नेत्यांच्या सभा होणार आहेत. या पार्श्वभूमीवर सुरक्षा यंत्रणेसह सर्वच व्यवस्थेवर प्रशासनाची करडी नजर आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची चिकलठाणा परिसरासह जालना इथंही सभा होणार आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची मराठवाडा सांस्कृतिक मंडळाच्या मैदानावर सभा होणार आहे. या सभेच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी काल पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली.

वंचित बहुजन आघाडीच्या नेत्या अंजली आंबेडकर यांच्याही उद्या छत्रपती संभाजीनगर शहरासह कन्नड, वैजापूर, गंगापूर इथं प्रचारसभा होणार आहेत.

समाजवादी पार्टीचे औरंगाबाद पूर्व मतदारसंघाचे उमेदवार डॉ अब्दुल गफार कादरी यांच्या प्रचारार्थ पक्षाचे नेते इकरा हसन, सनाखान, मुफती अनस उद्या शहरात प्रचारासाठी येत आहेत.

****

विधानसभा निवडणुकीसाठी राज्यात ४२६ मतदान केंद्रांचं नियंत्रण महिला अधिकारी-कर्मचारी करणार आहेत. महिलांचा मतदानातला सहभाग वाढवण्यासाठी 'महिला नियंत्रित मतदान केंद्र' स्थापन करण्यात येणार आहे. नाशिक जिल्ह्यात

सर्वाधिक ४५ मतदान केंद्रांचं नियंत्रण महिलांकडे असेल, तर वाशिम, सिंधुदुर्ग, गडचिरोली, हिंगोली जिल्ह्यात सर्वात कमी म्हणजेच प्रत्येकी तीन महिला नियंत्रित मतदान केंद्र असतील. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात – १३, बीड – आठ, जालना आणि लातूर प्रत्येकी सहा, नांदेड – नऊ, धाराशिव – चार, तर परभणी जिल्ह्यात आठ महिला नियंत्रित मतदान केंद्र असणार आहेत.

****

विधानसभा निवडणूक आचारसंहिता काळात राज्यभरात सी–व्हिजिल ॲपवर एकूण पाच हजार २८६ तक्रारी प्राप्त झाल्या, त्यापैकी पाच हजार २३० तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत. याच काळात विविध अंमलबजावणी यंत्रणांनी केलेल्या कारवाईत बेकायदा रोकड, मद्यासह इतर अंमली पदार्थ आणि मौल्यवान धातू असा सुमारे ५०२ कोटी ६३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलं आहे.

****

निवडणूक आचारसंहिता काळात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आतापर्यंत जवळपास १७ कोटी रुपयांची रोकड जप्त केल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा आचार संहिता कक्षाचे नोडल अधिकारी विकास मीना यांनी दिली.

***१५ ऑक्टोबरपासून सात लाख निधी आपण कॅश आपण सीझ केलेला आहे. लीकर, ड्रग्ज हे सगळे कॅटेगरी जर आपण ॲड केली तर सतरा कोटीचं इतकं साहित्य या इतक्या निधीचं आपण सीझ केलेलं आहे.***

[समीर पाठक – विकास मीना यांच्या पथकाची कारवायी – ]

विकास मीना यांची, आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर केंद्राच्या प्रादेशिक वृत्त विभागाचे प्रमुख समरजीत ठाकूर यांनी घेतलेली ही मुलाखत, आज सकाळी पावणे अकरा वाजता प्रासंगिक या कार्यक्रमात प्रसारित होईल. आमच्या AIR छत्रपती संभाजीनगर या यू ट्यूब चॅनलवरही आपल्याला ही मुलाखत ऐकता येईल.

****

विधानसभा निवडणुकीसाठी येत्या २० तारखेला मतदान करण्याबाबत नवमतदारांमध्ये उत्साहाचं वातावरण आहे. छत्रपती संभाजीनगर इथं एमबीए प्रथम

वर्षात शिकणारी नवमतदार मधुमिता सौंदणकर हिने सर्वांना मतदान करण्याचं आवाहन केलं आहे.

****

श्रोते हो, मतदारांनी, विशेषतः नवमतदारांनी मतदान करावं असं आवाहन आकाशवाणीकडून देखील करण्यात येत आहे. राजकीय उमेदवारांकडून विकासकामांबाबत तुम्हा मतदारांच्या असलेल्या अपेक्षा आमच्यापर्यंत पोहोचवा, आमची बातमीपत्रं तसंच समाजमाध्यमांवरुन आम्ही त्या प्रसारित करु. याबाबतचं आपल्या नावासह ध्वनिमुद्रण आमच्या ९४ २० ६९ २० २० या क्रमांकावर पाठवावं.

****

विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी सात वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज अहिल्यानगर जिल्ह्यातल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

नांदेड शहरात काल जिल्हा स्वीप कक्षाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते महात्मा गांधी पुतळ्यापर्यंत मानवी साखळी तयार करून मतदान जनजागृती करण्यात आली.

**

परभणी इथं मतदार जनजागृती अंतर्गत जिल्हास्तरीय रिल्स स्पर्धा घेण्यात येत आहे, यासाठी येत्या १८ नोव्हेंबर पर्यंत जास्तीत जास्त रिल्स सादर करण्याचं आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केलं आहे.

****

क्रिकेट

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्या तिसरा टी ट्वेंटी क्रिकेट सामना आज सेंच्युरियन इथं खेळवला जाणार आहे. मालिकेत दोन्हीही संघ एकेक सामना जिंकून बरोबरीत आहेत.

****